दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक),नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

24 तास सेवा || श्री नागनाथ कृपा || प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121

सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स

CHEMIST & DRUGIST

शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल

सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील

मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

मुंबई || वर्ष २ रे || अंक २४७ || गुरूवार २२ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# जिल्हा परिषद माध्यमिक शाळा हातेरी येथे ग्रामपंचयत मार्फत शाळेच्या आवारात व शालेय परिसरात झाडे लावून वृक्षारोपण.

पालघर : दिनेश आंबेकर

जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा हातेरी येथे ग्रामपंचयत मार्फत शाळेच्या आवारात व शालेय परिसरात पाम,मोरपंखी,जांभूळ, अशोक बदाम अशा विविध पद्धतीची झाडे लावून वृक्षारोपण करण्यात आले. ही संकल्पना हातेरी ग्रामपंचायतचे ग्रामसेवक मा.सोनेरी भाऊसाहेब यांच्या संकल्पनेतून साकार करण्यात आली.

तसेच हातेरी शाळेतील विद्यार्थांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांच्या समस्या शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांनी समजून घेऊन,शाळा व्यवस्थापन समिती यांनी विद्यार्थ्यांच्या सर्व अडचणी ग्रामपंचायत स्तरावर मांडल्या .सदर प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीअध्यक्ष श्री दीपक तुंबडा,उपाध्यक्ष श्री प्रभाकर गावित,

सदस्य जगदीश जंगली,गावातील प्रतिष्ठित व्यक्ती शिडा जंगली, पोलीस पाटील देवू गवते,मोहन दिघे,तुळशीराम चव्हाण,सीताराम खुताडे,पालक, ग्रामस्थ रावण रांदडा,मोतीराम कामडी यांनी ग्रामपंचायतचे सरपंच मा.रतन कोकाटे, ग्रामपंचायत सदस्य प्रदीप जंगली, कौशल्या रांदडा,जागृती जंगली आणि इतर ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक श्री सोनेरी भाऊसाहेब यांच्याशी सम्पर्क साधून ग्रामपंचायती मार्फत शाळेतील इयत्ता १ ली ते १० वीच्या एकूण २१८ विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या.त्याचप्रमाणे इयत्ता ९ वी आणि १० विच्या सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुतकांचे संच आणि कपडा खरेदी करून एक जोड गणवेश शिवून दिला आहे,

हातेरी शाळेत कोकणपाडा, रुईचापाडा,बोरीचापाडा ,शिवाचापाडा आणि हातेरी या गावातून विद्यार्थी शाळेत येतात.सदर कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचे पालक, ग्रामस्थ व शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित राहून सदर कार्यक्रम घडवून आणला.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदी दिसत होते.सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य,ग्रामपंचायत सदस्य यांचे शिक्षक व विद्यार्थी यांच्याकडून खूप खूप आभार.



# ''फास्ट ट्रॅक कोर्ट नको, आरोपीला आजच भरचौकात फाशी द्या''

**बदलापूर स्थानकात आंदोलकांच्या मागणीला जोर!**

बदलापूरमधील आदर्श शिक्षण संस्थेच्या शाळेत १३ ऑगस्ट रोजी दोन लहान मुलींवर शाळेतील शिपायाकडून लैंगिक अत्याचार झाला. सदर प्रकरणात गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिसांकडून दिरंगाई केली गेली. त्यानंतर संतापलेल्या पालकांनी आज बदलापूर रेल्वे स्थानक आणि आदर्श शाळेच्या बाहेर आंदोलन सुरू केले. सकाळी दहा वाजल्यापासून हे रेल्वे स्थानकावर आंदोलन सुरू असून यामुळे बदलापूर ते कर्जत लोकलसेवा ठप्प झाली आहे. दरम्यान, आंदोलक क्षणाक्षणाला आक्रमक होत असून आरोपीला आत्ताच भरचौकात फाशी द्या, अशी मागणी जोर धरू लागली आहे.रेल्वे स्टेशनवर आंदोलनकर्त्यांनी रेल रोको केल्याने वांगणी ते कर्जत, खोपोली या भागातून ठाणे, मुंबईच्या दिशेने येणाऱ्या नोकरदारांना कामाच्या ठिकाणी पोहचता आले नाही. सकाळी आंदोलन तीव्र झाल्याने बदलापूर पल्ल्याड नागरिकांनी घरातून काम करण्याचा निर्णय घेतला. रेल्वे प्रशासनाने अंबरनाथ ते सीएसएमटी पर्यंत उपनगरीय रेल्वेगाड्यांची वाहतूक सुरू ठेवली होती. तर कर्जत मार्गे जाणाऱ्या लांब पल्ल्यांच्या रेल्वेगाड्यांची वाहतूक पनवेल मार्ग वळविण्यात आली. दुपारनंतरही हा रेल रोको कायम होता. त्यामुळे काही रेल्वेगाड्या रद्द होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



**या प्रकरणात आम्ही सर्वजण रस्त्यावर उतरोल म्हणून सरकारने हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टाच चालवण्याचं आश्वासन दिलं. आम्ही रस्त्यावर उतरलो नसतो तर हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात गेलं असतं का? इतर राज्यात जे घडतं ते आम्हाला आमच्या राज्यात घडवायचं नाही. त्यामुळे या प्रकरणी आम्ही सरकारला फक्त सात दिवसांची मुदत देतोय. आम्ही सात दिवस इथून हलणार नाहीत, असं एका आंदोलनकर्त्याने म्हटलं**

**तर, ''आम्हाला आता आमच्या मुलींना बाहेर सोडायची भीती वाटतेय. शाळेत सोडायची भीती वाटते. आम्हाला सुरक्षेची चिंता आहे. त्यामुळे हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टातही नको, सात दिवसांची मुतदही नको. आजच आरोपीला भरचौकात फाशी द्या'', अशी संतप्त प्रतिक्रिया एका महिला आंदोलनकर्त्याने दिली.**

# यूपीएससीचा यू-टर्न, ४५ पदांची वादग्रस्त थेट भरती अखेर रद्द

नवी दिल्ली : विरोधकांकडून होणारी तीव्र टीका आणि सत्तेत सहभागी घटकपक्षांच्या विरोधानंतर केंद्र सरकारने केंद्रीय मंत्रालयांमध्ये खासगी क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची सहसचिव, संचालक, उपसचिव स्तरावरील ४५ जागांवर होणारी थेट भरती व त्यासाठीची जाहिरात रद्द करण्याची सूचना केंद्रीय लोकसेवा आयोगाला (यूपीएससी) मंगळवारी केली. त्याचे पालन यूपीएससीने केले आहे. केंद्रीय कार्मिक खात्याचे राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी यासंदर्भात यूपीएससीच्या अध्यक्ष प्रीती सूदन यांना एक पत्र लिहिले होते. भाजप अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी यांचा आरक्षणाचा हक्क हिरावून घेत असल्याची टीका काँग्रेसने केली होती.

जितेंद्र सिंह यांनी म्हटले की, समाजातील उपेक्षित घटकांना सरकारी सेवेमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळायला

हवे. सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीने ही गोष्ट अतिशय आवश्यक असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मत आहे. या थेट भरतीसाठी प्रसिद्ध झालेली जाहिरातही रद्द करण्यात आली आहे. सदर पदांच्या भरतीसाठी यूपीएससीने १७ ऑगस्ट रोजी अधिसूचना प्रसिद्ध केली होती. ज्या ४५ पदांसाठी थेट भरती करण्यात येणार होती, त्यावर विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यासाठी आरक्षण ठेवले नव्हते. मात्र, आता या गोष्टीचा फेरआढावा घेणे व पंतप्रधाना नरेंद्र मोदी यांच्या सामाजिक न्यायाबाबतच्या दृष्टिकोनानुसार ही निवड प्रक्रिया पार पाडणे आवश्यक आहे.




**या आधी कधी झाली थेट भरती?**

**वीरप्पा मोईली यांच्या अध्यक्षतेखाली २००५ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने सरकारी नोकऱ्यांमध्ये थेट भरतीस मान्यता दिली होती.**

**अशीच शिफारस सहाव्या वित्त आयोगाने २०१३ साली केंद्र सरकारला केली होती. त्यावेळी व नंतरही केंद्र सरकारच्या विविध खात्यांत थेट भरतीद्वारे व आरक्षणाशिवाय ही पदे भरण्यात आल्याची उदाहरणे आहेत.**

-----------------

**विविध मंत्रालयांतील सचिव,**

**यूआयडीएआयचे प्रमुख अशी महत्त्वाची पदेही याच प्रक्रियेद्वारे भरण्यात आली होती. पूर्वीच्या सरकारमध्ये राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे सदस्य पंतप्रधान कार्यालयावर नियंत्रण ठेवत असत हे सर्वांना माहिती, आहे असा टोला जितेंद्र सिंह यांनी लगावला.**

## मंकीपॉक्सवरील लस बनवणार सीरमचे अदर पुनावाला यांनी दिली माहिती

नवी दिल्ली: भारतासह अनेक देशांची चिंता वाढविणाऱ्या मंकीपॉक्स या विषाणूजन्य आजारावर सीरम इन्स्टिट्यूट लस बनविणार आहे. कंपनीचे सीईओ अदर पुनावाला यांनी यासंदर्भात माहिती दिली.भारतात मंकीपॉक्सचे रुग्ण आढळले आहेत. पाकिस्तानातही काही रुग्णांना या विषाणूचा संसर्ग झाला आहे. याशिवाय इतर काही देशांमध्येही मंकी पॉक्स पसरत आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेदेखील याला वैद्यकीय आपत्ती म्हटले आहे. विषाणूंमुळे पसरणाऱ्या या आजारावर लस तयार करण्याचे काम सुरू असल्याचे पूनावाला यांनी सांगितले. साधारणतः वर्षभरात याबाबत आम्ही चांगली बातमी देऊ, असे ते म्हणाले.

# शिवसेना (उ.बा.ठा)त मुस्लिम युवकांचा जाहीर प्रवेश

युवकांचे हृदयस्थान शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव साहेब ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून जिल्हा संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर, जिल्हा सहसंपर्कप्रमुख दत्ताभाऊ, पाटील जिल्हाप्रमुख वसंतराव भोजने, महिला आघाडी जिल्हाप्रमुख चंदाताई बढे, विधानसभा संपर्कप्रमुख ललित मुथा यांच्या मार्गदर्शनाखाली मलकापूर शिवसेना शहर प्रमुख गजानन ठोसर,उपशहर प्रमुख शकील जमादार यांच्या प्रमुख उपस्थितीत पारपेठ व बारादारी भागातील शाहरुख खान, जुनेद खान, फरदीन खान, सलमान खान, मिर्झा जुनेद इमरान खान, साबीर खान, अरबाज खान, दानिश मिर्झा, अंकुश, अर्शद जमादार, साहिल खान, गुल्लूभाई, विहान खान, कलीम खान,शेख आया, अनिश खान, शेख समीर,तौकिफ खान, प्रणव, सलीम खान, अरबाज खान, समीर मेमन सह असंख्य मुस्लिम युवकांनी शनिवार रोजी स्थानिक विश्रामगृहावर शिवसेनेत जाहीर प्रवेश केला, यावेळी शहर प्रमुख गजानन ठोसर,शहर उपप्रमुख शकील जमादार यांनी त्या युवकांच्या गळ्यात भगवा रुमाल घालून त्यांचे शिवसेनेत स्वागत केले.



# ''बाबा, तुमची शिकवण माझ्यासाठी'', राहुल गांधींची वडिलांसाठी भावनिक पोस्ट; राजीव गांधींच्या जयंतीनिमित्त व्यक्त केल्या भावना!

दिल्ली : भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने आज काँग्रेसचे नेते, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांकडून त्यांना अभिवादन केलं जात आहे. राजीव गांधी यांच्याबद्दलच्या आठवणी ताज्या करणाऱ्या पोस्ट सोशल मीडियावर शेअर केल्या जात आहेत. राजीव गांधींचे पुत्र व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या वडिलांसाठी एक्सवर पोस्ट शेअर केली असून त्यात आपल्या वडिलांची स्वप्न आपली मानून ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं राहुल गांधींनी नमूद केलं आहे.''एक करुणामय व्यक्तिमत्व, सौहार्द व सद्भावनेचं प्रतीक'', अशी उपमा राहुल गांधींनी आपल्या वडिलांसाठी पोस्टमध्ये नमूद केली आहे. ''बाबा, तुमची शिकवण माझी प्रेरणा आहे. भारतासाठीची तुमची स्वप्नं तीच माझीही स्वप्न आहेत. तुमच्या आठवणी सोबत घेऊन मी ती स्वप्नं पूर्ण करेन'', असं कराहुल गांधींनी वडिलांसाठी केलेल्या पोस्टमध्ये नमूद म्हटलं आहे. आज सकाळी राहुल गांधींनी दिल्लीतील वीर भूमीला भेट दिली. तसेच, राजीव गांधींना त्यांच्या जयंतीदिनी आदरांजली वाहिली.

''राजीव गांधींचं अल्पकालीन प्रभावी राजकीय जीवन''

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राज्यसभा खासदार जयराम रमेश यांनीही देशाच्या राजकीय व तंत्रज्ञानविषयक पटलावरील विकासात राजीव गांधींच्या योगदानाचा सोशल पोस्टमध्ये उल्लेख केला.

''आज राजीव गांधींची ८०वी जयंती आहे. त्यांचं राजकीय जीवन अल्पकालीन पण अत्यंत प्रभावी ठरलं. १९८५ च्या अर्थसंकल्पात अर्थविषयक धोरणांचा एक नवा दृष्टीकोन मांडण्यात आला होता. या अर्थसंकल्पात राजीव गांधींची महत्त्वाची भूमिका होती. राजीव गांधींच्या हत्येपूर्वी काही आठवडे त्यांनी १९९१ च्या निवडणुकांसाठीच्या जाहीरनाम्यावर बरंच काम केलं होतं. त्यातील आर्थित तरतुदींच्या पार्श्वभूमीवर नरसिंग राव-मनमोहन सिंग यांनी जुलै १९९१ मध्ये देशात मोठ्या प्रमाणावर आर्थिक सुधारणा राबवल्या'', असं रमेश यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे.

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधींनी १९८४ साली काँग्रेसची सूत्रं हाती घेतली. अवघ्या ४०व्या वर्षी राजीव गांधी देशाचे पंतप्रधान झाले. राजीव गांधी हे भारताचे सर्वात कमी वयाचे पंतप्रधान ठरले.

संपादकीय

## एकमत

सुमारे पाव शतकाहून अधिक वर्षे न्यायप्रविष्ट असलेल्या या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ जणांच्या खंडपीठाने ८-१ अशा बहुमताचा निकाल दिला. पेट्रोलजन्य घटक वगळता कोळसा, लोह, लोहखनिज, तांबे, बॉक्साईट आदी खनिजांस हा निकाल लागू होतो. मुळात हा खटला 'मिनरल एरिया डेव्हलपमेंट ऑथोरिटी विरुद्ध स्टील ऑथोरिटी ऑफ इंडिया' या नावे ओळखला जातो. त्यात पुढे झारखंड, प. बंगाल, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक ही राज्ये उतरली आणि या सर्वांनी मिळून केंद्राच्या अधिकारांस आव्हान दिले. ही सर्व राज्ये खनिजसंपन्न आहेत; हे ओघाने आलेच. ही राज्ये 'स्वामित्व मूल्य' (रॉयल्टी) आकारून खनिजे काढण्याची कंत्राटे सरकारी वा खासगी कंपन्यांस देतात; हा प्रघात. जेव्हा काही राज्यांनी या स्वामित्व मूल्याखेरीज खनिकर्म उद्योगावर आणखी कर आकारला त्या वेळी त्यात बदलाचा प्रयत्न झाला. त्यास न्यायालयात आव्हान दिले गेले आणि दोन स्वतंत्र टप्प्यांवर सात आणि पाच सदस्यांच्या खंडपीठाने दोन स्वतंत्र निकाल दिले. यातील एका निकालात 'स्वामित्व मूल्य' म्हणजेच कर असा निष्कर्ष होता, तर दुसऱ्या पीठाने कर आणि स्वामित्व मूल्य हे दोन भिन्न मुद्दे असल्याचे सांगितले. अशी मतभिन्नता झाल्याने अंतिम निवाड्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने नऊ न्यायाधीशांचे स्वतंत्र पीठ यासाठी स्थापन केले. दस्तूरखुद्द सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यासह हृषीकेश रॉय, अभय ओक, जे. बी. पारडीवाला, मनोज मिश्रा, उज्जल भुयान, सतीश चंद्र शर्मा आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीहा तसेच न्या. बी. व्ही. नागरत्ना यांचा यात समावेश होता. यातील आठ न्यायाधीशांचे ''स्वामित्व धन आणि कर हे दोन भिन्न मुद्दे आहेत आणि राज्यांना स्वामित्व धनाखेरीज स्वतंत्र कर आकारणी करण्याचा अधिकार आहे'' यावर एकमत झाले आणि न्या. नागरत्ना यांनी स्वतंत्रपणे आठ मुद्द्यांद्वारे आपली मतभिन्नता नोंदवली. त्यांच्या मते ''जमीन हा विषय जरी राज्यांच्या अखत्यारीत असला तरी त्या जमिनींखालील खनिजे आणि मूलद्रव्यांवर केंद्र सरकारचा हक्क असतो; सबब राज्यांना त्यावर कर आकारण्याचा हक्क नाही.'' सर्वोच्च न्यायालयातील आठ न्यायमूर्तींनी हा मुद्दा नाकारला. स्वामित्व मूल्य आणि कर या दोन मुदलात स्वतंत्र बाबी आहेत, स्वामित्व मूल्य म्हणजे कर नाही आणि जमीन हा मुद्दा घटनेनुसार राज्यांच्या अखत्यारीत असल्याने त्या जमिनीतून निघणाऱ्या खनिजावर राज्यांस अधिकार नाही असे म्हणता येणार नाही, असे न्या. चंद्रचूड लिखित बहुमताच्या निकालात स्पष्ट केले गेले. आता प्रश्न या निकालाच्या पूर्वलक्ष्यी प्रभावाचा.

त्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाशी पूर्णांशाने सहमत होणे अवघड. यातून खाण कंपन्यांस किमान दोन लाख कोटी रुपये विविध राज्यांच्या तिजोरीत भरावे लागतील. या खाण कंपन्यांची बाजू घ्यावी असे काहीही नाही, हे खरे. तेव्हा त्यांच्या पर्यावरण-दुष्ट पोटास चिमटा बसत असेल तर त्याचा सामान्यजनांस आनंदच व्हायला हवा. परंतु तरीही त्यांना तुम्ही काही वर्षांपूर्वी जे केले त्यावर तेव्हापासून आजतागायत कर आकारणे अन्यायाचे ठरते. कोणतीही वसुली ही उत्तरलक्ष्यीच असायला हवी. या संदर्भात एक बरे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने राज्यांवर पूर्वलक्ष्यी करवसुली करताना विलंब शुल्क, कर रकमेवर व्याज आदी आकारण्यास सक्त मनाई केलेली आहे. मूळ रक्कम तेवढी मागेपासून आकारली जाईल. तसेच या पूर्वलक्ष्यी कराची वसुली एका टप्प्यात केली जाणार नाही. तरीही ही रक्कम मोठी आहे. झारखंड या एकट्या राज्यानेच सुमारे दीड लाख कोटी रुपये वसुलीची अपेक्षा यावर व्यक्त केली. दुसरे असे की पूर्वलक्ष्यी वसुलीच्या आपल्या आठवणी. व्होडाफोन प्रकरणात असा पूर्वलक्ष्यी प्रभावाने करवसुलीचा निर्णय तत्कालीन अर्थमंत्री प्रणब मुखर्जी यांनी (२०१२) घेतला. ते प्रकरण आंतरराष्ट्रीय पातळीवर अंगाशी आले. मुद्दा होता व्होडाफोनने दुसरी एस्सार टेलिफोन या कंपनीवर स्वामित्व मिळवले त्या व्यवहाराचा. यावर 'कॅपिटल गेन्स टॅक्स' पूर्वलक्ष्यी प्रभावाने दिला जावा असे अर्थमंत्री प्रणबदांस वाटले. या काँग्रेसी अर्थमंत्र्याचे एका विशेष उद्योगघराण्याशी असलेले मधुर संबंध यामागे किती आणि प्रामाणिक कर गरज किती या प्रश्नाच्या उत्तरात न जाताही त्याची आठवण उद्योगविश्वास आजही अस्वस्थ करते. हे जू मानेवरून उतरण्यास जवळपास नऊ वर्षे गेली. तेव्हा प्रश्न असा की हा इतिहास असतानाही सर्वोच्च न्यायालयाने खाणप्रकरणी अशी मुभा का दिली? तशी ती दिली नसती आणि सर्व करवसुली उत्तरलक्ष्यी प्रभावाने ठेवली असती तर अधिक गुंता झाला असता,

# बदलापुरात चार वर्षांच्या दोन चिमुरड्यांवर शाळेतच अत्याचार, शेकडो पालक रस्त्यावर,रुळावर येत रेल रोको आंदोलन..फाशी ची मागणी

दै, सूर्योदय,
कल्याण,(प्रतिनिधी):

बदलापूर येथील आदर्श विद्यालयमध्ये शिशुवर्गात शिकणाऱ्या दोन मुलींवर सफाई कामगाराने लैंगिग अत्याचार केले. झालेल्या अत्याचार प्रकरणी अखेर कारवाई करण्यास सुरुवात झाली आहे. या प्रकरणी आरोपी अटकेत असला तरी या संपूर्ण घटनेत पोलीस प्रशासनाने जो बेजबाबदारपणा दाखवला त्याप्रकरणी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची तत्काळ बदली करण्यात आली आहे. तर दुसरीकडे शाळा प्रशासनाने मुख्याध्यापिका, शिक्षिका आणि मुलांची नेआण करण्याची जबाबदारी असणाऱ्या सेविकांचे निलंबन केले आहे. या घटनेनंतर पालक संतप्त आझाले असून त्यांनी बदलापूर बंदची हाक दिली आहे. संतप्त पालकांनी व आंदोलकांनी रेल्वे रोको आंदोलन केले आहे. मोठ्या प्रमाणात नागरिकांनी बदलापूर स्थानकात रेल्वे रुळावर उभे राहून घोषणा देऊन आरोपीला कठोर शिक्षा करण्याची मागणी केली आहे. या आंदोलनामुळे या मार्गावरची सेवा ठप्प झाली आहे.ही घटना उघडकीस आल्यावर पालक आणि नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे. नागरिकांनी बदलापूर बंदची हाक दिली आहे. काही पालकांनी शाळेवर मोर्चा काढला तर काही पालकांनी आज बदलापूर रेल्वे पालकांनी सकाळी दहा वाजता रेल रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे अप आणि डाऊन या दोन्ही मार्गावरील रेल्वे सेवा पूर्णपणे ठप्प झाली



आहे.अनेकांच्या हातात फलक होते. आंदोलकांनी रुळावर येत रेल रोको आंदोलन सुरू केले. यावेळी उपस्थित आंदोलकांनी अत्याचार प्रकरणातील पीडितांना न्याय देण्याची मागणी करत, आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. आरोपीला फाशी द्या अशी घोषणाबाजी देखील आंदोलकांनी केली. सुरवातीला आंदोलक पालक हे शाळेच्या पुढे जमले होते. सकाळी साडेसहा वाजता सर्व पालकांनी आंदोलनाला सुरुवात केली. यावेळी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यानंतर संतप्त झालेल्या आंदोलक पालकांनी थेट बदलापूर रेल्वे स्थानकात जात रेल्वे रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे डाऊन मार्गावरील कोयना एक्सप्रेससह संतप्त आंदोलकांनी रोखून धरली होती.पालकांचा मोठा गट रेल्वे रुळावर आल्याने रेल्वे प्रशासनाची तारांबळ उडाली. यावेळी रेल्वे पोलिस आणि स्थानिक पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला. सध्या पालकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला.ङ्ग बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियमअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणामध्ये तपास करुन आरोपीला अटक केली. अक्षय शिंदे असे या आरोपीचे नाव आहे. तो २४ वर्षांचा असून या शाळेतील सफाई कर्मचारी म्हणून तो काम करत होता.ङ्गतसेच तक्रार दाखल करण्यास टाळाटाळ करणाऱ्या बदलापूर पूर्वेकडील पोलीस अधिकाऱ्यांचीही बदली करण्यात आली आहे. या पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास हलगर्जी केल्याचा आरोप करत बदली केल्याची माहिती समोर आली आहे. तसेच संस्था चालकांवरही कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी शिक्षण संस्थेने एक चौकशी समिती नेमली आहे.ङ्गबदलापूर पोलिसांकडून संस्था चालक व शिक्षकांची देखील चौकशी करण्यात आली आहे. तसेच याप्रकरणी शाळा प्रशासनावरही गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यासोबच महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने या प्रकरणाची योग्य ती दखल घेतली आहे. तसेच याप्रकरणी कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात घेऊन यावर तात्काळ कारवाई करुन कठोर शिक्षा करण्यात यावी, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिले आहेत.दरम्यान, गुन्हेगारास कठोर शिक्षा करण्याचे आश्वासन देत नागरिकांची समजूत काढू पाहणाऱ्या मंत्री गिरीश महाजन यांना नागरिकांच्या रोशास सामोरे जावे लागले. आरोपीला आमच्या ताब्यात द्या अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली. तसेच, उपस्थित जमावातून फाशी.. फाशी.. फाशी असाही आवाज उमटला.दरम्यान, घडलेली घटना वाईट आहे. त्याचे कोणीही समर्थन करणार नाही. सरकारनेही या घटनेची दखल घेतली आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन केली आहे. नागरिकांची भावना समजू शकतो. मात्र, पाठिमागील पाच ते सहा तासापासून नागरिक रुळावर बसले आहेत. त्यामुळे लोकल ट्रेनवर परिणाम झाला आहे. परंतु रेल्वे ही मुंबईची लाईफलाईन आहे हजारो लोक याचा वापर करतात. मुख्यमंत्री आणि डीसीएम म्हणाले की, एसआयटी स्थापन करण्यात आली आहे, चौकशी केली जाईल आणि त्यावर जलदगतीने कारवाई केली जाईल... दोषीला लवकरात लवकर शिक्षा व्हावी, अशी आमचीही इच्छा आहे... ज्यांनी निष्काळजीपणा दाखवला, त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे गिरीश महाजन म्हणाले.

# कर्जत मुस्लिम समाजाचे आमरण उपोषण तुर्तास स्थगित लवकर मागण्या पूर्ण करणार प्रशासनाचे आश्वासन

कर्जत । जयेश जाधव

कर्जतमधील मुस्लिम कब्रस्तानात बेवारस प्रेत पूरत असल्याबाबत येथील मुस्लिम समाजाने फेब्रुवारीपासून सर्व शासकीय कार्यालयांशी पत्रव्यवहार केले आहेत. मात्र, अद्याप कुठल्याच प्रकारचे समाधानकारक उत्तर कोणत्याही कार्यालयाने दिले नसल्यामुळे सोमवारी (दि.१९) मुस्लिम समाजाने आमरण उपोषण सूरू केले आहे.आज मंगळवारी दि .२०/८/२०२४ रोजी प्रशासनाने दखल घेऊन उपोषण स्थळी भेट घेतली असून सकारात्मक चर्चा करून सदरचे उपोषण तुर्तास स्थगित करण्यात आले आहे.ङ्गङ्ग याबाबत माहिती अशी की,कर्जत येथील लोकमान्य



टिळक चौकात मुस्लिम समाजाच्यावतीने युसुफ आश्रफ खान आणि लियाकत अली इबादअली खान हे दोघे आमरण उपोषणाला बसले आहेत. आमच्या मुस्लिम समाजाचे कब्रस्तान (दफनभूमी) कर्जत रेल्वे लाईनच्याजवळ आणि उल्हास नदीच्या काठावर आहे. गेली दोन ते तीन वर्षापासून येथे बेवारस प्रेत पुरण्याचे काम सुरू आहे. मुस्लिम समाजाच्या व्यतिरिक्त कुठल्याही समाजाला या कब्रस्तानामध्ये प्रेत पुरण्याचा अधिकार नाही, त्यांची चौकशी व्हावी. असे काम करणार्या दोषी व्यक्तीला किंवा यामध्ये असले काम करून घेणार्याला तसेच मुस्लिम समाजाच्या भावनांशी खेळणार्या, आपापसात तेढ निर्माण करणार्या दोषीला शिक्षा व्हावी, अशी मागणी मुस्लिम समाजाच्यावतीने करण्यात आली आहे.आज मंगळवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास वैभव गारवे मुख्याधिकारी, कर्जत नागरपरिषद व मा. पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी उपोषणकर्त्यांच्याशी चर्चा करून आमचे उपोषण तात्पुरते स्थागित करण्याचे ठरविले आहेत . यावेळी प्रमुख मागण्या मध्ये मुस्लिम करब्रस्थान येते बेवारस प्रेत पुरणाऱ्या विरुद्ध चोकशी करून लवकरात लवकर अहवाल देणार तसेच कर्जत नगरपरिषद प्रशासन व कर्जत पोलीस स्टेशन यांनी सामुहिक चर्चासाठी बोलवणार.. बोर्ड ला या विषयाची माहिती देणार..ङ्ग मुस्लिम समाजाला समाधानकारक उत्तर अपेक्षित आहे. या मागण्या पूर्ण न झाल्यास पुढील उपोषण जिल्हाधिकारी रायगड व मा. पोलिस अधीक्षक रायगड ऑफिस च्या समोर मुस्लिम समाज सहकुटुंब उपोषण करणार असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले असून तुर्तास उपोषण स्थगित करण्यात आले आहे.

# नागोठणे वरवठणे अंबा नदीवरील शिवकालीन पूल मोजतोय अखेरची घटका

रिपोर्टर, धम्मशील सावंत

जुन्या , जर्जर, मोडकळीस आलेल्या पुलावर वाजतेय धोक्याची घंटा

दगडी चिरे ढासळून सळ्या निघाल्या बाहेर

वाहतूक आणि वर्दळीच्या दृष्टीने पूल अत्यंत महत्वाचा

शिवकालीन पूल म्हणून पुलाची वैशिष्ट्य पूर्ण ओळख

अनेक गावे, आदिवासी वाड्या पाड्या, तालुक्याना जोडणारा पूल ठरतोय दुवा

धोकादायक पूल कोसळून दुर्घटना होण्याची भीती

नवीन पूल बांधण्याची गावकरी, स्थानिकांची मागणी

पाली /बेणसे (धमशील सावंत )........ रायगड जिल्ह्यातील महाड सावित्री पूल दुर्घटना आजही सर्वांच्या स्मरणात आहे. जगभरात हाहाकार माजवणाऱ्या या दुर्घटनेनंतर सरकार ने राज्यातील सर्वच धोकादायक पुलांचे स्ट्रक्चर ऑडिड करून पुलांच्या सुरक्षे बाबत



ठोस पावले उचलली. मात्र आजही रायगड जिल्ह्यातील अनेक पूल न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. नागोठणे वरवठणे अंबा नदीवरील शिवकालीन पूल सध्या जीर्ण आणि धोकादायक स्थितीत असून अखेरची घटका मोजतोय. जुन्या , जर्जर, मोडकळीस आलेल्या पुलावर धोक्याची घंटा वाजतेय. कधी कोणती आणि किती मोठी दुर्घटना घडेल याचा नेम नाही. या पुलाची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. पुलाच्या दोन्ही बाजूचे संरक्षण कठडे नदीत तुटून पडलेत. पुलाची खालील बाजू कमकुवत झालीय. ठिकठिकाणी दगडी चिरे ढासळून सळ्या बाहेर निघाल्यात. ङ्गवाहतूक आणि वर्दळीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेल्या या पुलावरून जाणारे प्रवाशी, विद्यार्थी, शेतकरी, कामगार स्थानिक, महिला वर्गात भीतीचे वातावरण आहे.या अरुंद पुलावरून जाता येताना हादरे बसत असल्याने प्रवाशी वर्गाला जीव मुठीत घेऊन जावे लागते. शिवकालीन पूल म्हणून पुलाची वैशिष्ट्य पूर्ण ओळख आहे मात्र पुलाच्या दुरावस्थेकडे कुणी ढुंकूनही पाहायला तयार नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते किशोर म्हात्रे व स्थानिकांनी केलाय.ङ्गअनेक गावे, आदिवासी वाड्या पाड्या, महत्वाच्या तालुक्याना जोडणारा पूल नेहमीच दुवा ठरतोय. सदरचा पूल हा रायगडचा ऐतिहासिक ठेवा असून त्याचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी नागोठणे वरवठणे आंबा नदीवर ङ्गलवकरात लवकर मजबूत आणि रुंद असा नवीन पूल बांधण्यात यावा आणि सर्वांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा अशी मागणी गावकरी, स्थानिकांनी केलीय.

## पाचेरीसडा नं. १ शाळेत स्वातंत्र्य दिनी ग्रामस्थांकडून शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप..!

स्वातंत्र्य दिन विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा..!

आबलोली (संदेश कदम) गुहागर तालुक्यातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक मराठी शाळा पाचेरीसडा नं. १ या शाळेत स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. शाळेतील ध्वजारोहण करुन विद्यार्थ्यांनी निर्मल ग्रामपंचायत पाचेरीसडा याठिकाणी प्रभातफेरी काढली यावेळी शाळेमध्ये विद्यार्थी मनोगत, निपुण प्रतिज्ञा, बालसभा असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून ''मिशन आपुलकी'' अंतर्गत गावातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या ग्रामस्थांनी शाळेला शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप करून शाळेच्या प्रगतीसाठी एक हात पुढे करून योगदान दिले . हे योगदान मिळण्यासाठी श्री.संजय वाघ यांनी विशेष प्रयत्न केले. यामध्ये ज्ञानदीप सेवा मंडळ बौद्धवाडी या मंडळा कडून १० चटई शाळेला भेट म्हणून देण्यात आल्या तर जय जांगलदेव विकास मंडळ पंड्येवाडी या मंडळा कडून शाळेला दोन फॅन सेट आणि ४ कागद रिम भेट म्हणून देण्यात आले तसेच श्री. जगदीश यादव यांचेकडून तीन बॅट, दोन स्टम्प जोडी, एक बॉक्स बॉल, १५ नग दोरी उड्या रशा, बॅडमिंटन २ जोडी, टेबल टेनिस १ जोडी असे एकुण १०,०००/- रुपये किमतीचे क्रिडा साहित्य आणि विद्यार्थ्यांसाठी खाऊ देण्यात आला तर श्री. महेंद्र यादव यांच्या कडून शाळेसाठी वॉटर प्युरिफायर भेट देण्यात आला आणि श्री. सुनील यादव यांच्या कडून शाळेला दोन घड्याळे भेट देण्यात आली तसेच शाळा व्यवस्थापन समिती पाचेरीसडा नं. १ मार्फत या सर्व देणगी दारांचा कृतज्ञता सोहळा उत्साहात पार पडला या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अनिल भाऊ जोशी यांनी भूषविले या कार्यक्रमाला माजी सरपंच संतोष आंब्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. प्राजक्ताताई डिंगणकर, उपाध्यक्ष श्री. अनिल जोशी, तंटामुक्ती समीती अध्यक्ष श्री. शशिकांत यादव, सामाजिक कार्यकर्ते श्री. राजन खरे,



श्री. धर्मानंद यादव, श्री. जगदीश यादव, वर्षाताई डिंगणकर, रेणुका वेलोंडे, आप्पा मालप यांचेसह ग्रामस्थ बहूसंख्येने उपस्थितीत होते. शाळेच्या शैक्षणिक प्रगती बद्दल श्री. संतोष आंब्रे, श्री. धर्मानंद यादव यांनी आपल्या मनोगतातून समाधान व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. संजय वाघसर, श्री. लबडे सर, रुईकर मॅडम, मुळेसर यांनी विशेष प्रयत्न केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे उपशिक्षक श्री. लबडे यांनी केले शेवटी सर्व विद्यार्थ्यांना, पालकांना आणि ग्रामस्थांना शाळा व्यवस्थापन समिती पाचेरीसडा नं. १ यांचेकडून मिठाई देण्यात आली. कार्यक्रमाच्या समारोप करताना उपस्थितीत सर्वांनी ''निपुण प्रतिज्ञा'' घेतली शेवटी मुख्याध्यापक श्री. संजय वाघ यांनी सर्व देणगीदारांचे, ग्रामस्थांचे आभार मानून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जालगाव श्रीरामनगर अधिकृत एस टी बस थांबा

दापोली :- दापोली तालुक्यातील दाभोळ मार्गावरील जालगांव श्रीरामनगर येथे अधिकृत एसटी बस थांबा व्हावा असे निवेदन श्रीरामनगर मित्र मंडळाकड प्रवासी




राजा दिन या दापोली आगारात आयोजित कार्यक्रमात विभागिय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत देण्यात आले होते. या मागणीचा स्विकार करून अल्पावधीतच मंजूरी देण्यात आली. या थांब्याचा नामफलक अनावरण सोहळा जालगांव ग्रामपंचायतीचे सरपंच अक्षय फाटक,गावसई अद्यक्ष अशोक जालगांवकर,दापोली आगार व्यवस्थापक रेश्मा मधाळे मॅडम,उपसरपंच राजेद्र चव्हाण,ग्राप सदस्य मृणाल लिंगावळे,स्थानक प्रमुख नाकडे साहेब आणि ग्रामस्थ बंधु भगीनीच्या उपस्थितीत संपन्न झाला.सरपंच अक्षय फाटक यांनी एसटी आगार प्रमुख यांचे आभार व्यक्त केले . ङ्ग नामफलक अनावरण कार्यक्रमानतंर श्रीशैल सभागृहात पार पडलेल्या सत्कार सोहळ्यात श्रीरामनगर मित्रमंडळाकडुन मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. अधिकृत एसटी थांबा या नामफलकाचे देणगीदार प्रविण गुरव यांचा या कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीरामनगर ,गंधर्व नगरी येथील ग्रामस्थ बंधुभगीनी,जेष्ठ नागरीक,युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीरामनगर वाडी अद्यक्ष,उपाध्यक्ष,कमीटी सदस्य,युवक सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले.

## तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेत देव्हारे विद्यालयाची विजयी परंपरा कायम.

मंडणगड येथे २०/८/२०२४ रोजी पार पडलेल्या तालुकास्थरीय खो -खो स्पर्धेत १९ वर्ष वयोगटातील मुली या विजेत्या ठरल्या. १९ वर्ष वयोगटातील मुले ही उपविजेतेपद पटकविले. त्यामुळे विद्यालयाचे प्राचार्य श्री. कापसे सर, सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, स्थानिक कमिटी सदस्य, यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संघ प्रशिक्षक श्री. सौरभ गोरीवले, संघ व्यवस्थापक श्री. योगेशकुमार केसरे यांनी या विजयामध्ये मोलाचे योगदान दिले. त्यामुळे त्यांचेही सर्वत्र कौतुक होत आहे.



## १ सप्टेंबर रोजी आबलोली येथे गुहागर तालुका कुणबी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सभेचे आयोजन

आबलोली (प्रतिनिधी)

गुहागर तालुक्यातील कुणबी समाजाच्या गुहागर तालुका कुणबी नागरी

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई — ठाणे·रायगड·रत्नागिरी·सिंधुदुर्ग



गुहागर तालुका कुणबी नागरी सहकारी पतसंस्था लि. आबलोली

सहकारी पतसंस्था लिमिटेड आबलोली या पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी

११:०० वाजता गुहागर तालुका कुणबी नागरी सहकारी पतसंस्था लिमिटेड आबलोली या पतसंस्थेच्या प्रधान कार्यालयातील सभागृहात पतसंस्थेचे अध्यक्ष श्री.रामचंद्र रत्नू हुमणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे तरी सभासदांनी सभेला वेळेत उपस्थित रहावे असे जाहीर आवाहन गुहागर तालुका कुणबी नागरी सहकारी पतसंस्था लिमिटेड आबलोली या पतसंस्थेचे अध्यक्ष श्री.रामचंद्र हुमणे, उपाध्यक्ष श्री.तुकाराम निवाते, संचालक श्री.पांडूरंग पाते, श्री.प्रदिप बेंडल, श्री.महादेव वणे, श्री.संदेश कदम, श्री.वैभव आदवडे , श्री.उदय गोरीवले, श्री.अमोल वाघे, संचालिका श्रीमती.वनिता डिंगणकर,सौ.श्रावणी पागडे,तज्ञ संचालक श्री.अनंत पागडे, श्री.संदीप पास्टे,कार्यलक्षी संचालक श्री.अनिल घाणेकर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

## टक्क्यांनी घटले.

जम्मू काश्मिरात सर्व कसे सुरळीत आहे हे दाखवण्यास केंद्र उत्सुक असेल. पण पूर्ण राज्याचा दर्जा देणे हे सुरळीतपणाचे प्रमाण ठरेल पंतप्रधानांनी 'एक देश, एक निवडणूक' या संकल्पनेचा पुनरुच्चार करून चोवीस तास उलटत नाहीत तोच निवडणूक आयोगाने चार राज्यांसाठी दोन स्वतंत्र निवडणूक कार्यक्रम उघड केले. त्यानुसार जम्मू-काश्मीर आणि हरियाणा या राज्यांच्या निवडणुका लगेच सप्टेंबरात होऊन ऑक्टोबराच्या पहिल्या आठवड्यात त्यांचे निकाल लागतील. दुसऱ्या टप्प्यात दीपावलीनंतर महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यांत निवडणुका होतील. अशा विभागणीतून या यंत्रणेच्या स्वायत्ततेचे दर्शन घडते असे लाडक्या भोळ्या-भाबड्या भक्तगणांस वाटत असल्यास त्यांचा आनंद हिरावून घेण्याचा अधिकार 'इंडिया'स नाही. आयोगाने असे केले त्यात अर्थातच श्रेष्ठींची सोय आहे. त्यामागे दोन प्रमुख कारणे भक्तेतरांस दिसतील. एक म्हणजे एकाचवेळी अधिकाधिक ठिकाणी श्रेष्ठींस प्रचारात झोकून देता यावे हा. दुसरा मुद्दा आयोगाच्या स्त्रीदाक्षिण्याचा. निवडणुका लांबविल्यास महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींची रक्षाबंधनास सुरू झालेली ओवाळणी भाऊबीजेपर्यंत लांबवता येणे आणि झारखंडाच्या मुख्यमंत्र्यांमागे आणखी काही शुक्लकाष्ठे लावण्यास अधिक मुभा मिळणे. हे झाले आयोगाने न घेतलेल्या निर्णयाचे विश्लेषण. आता घेतलेल्या निर्णयाविषयी. म्हणजे हरियाणा तसेच जम्मू-काश्मीर या राज्यांतील निवडणुकांविषयी.

प्रथम हरियाणा. या राज्यात एकाच टप्प्यात १ ऑक्टोबरास निवडणुका होतील. सध्या त्या राज्यात प्रेमळ राज्यपालांच्या सौजन्याने भाजप सत्तेत आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकांत भाजपच्या या राज्यातील खासदारांची संख्या शंभर टक्क्यांवरून पन्नास टक्क्यांवर आली. म्हणजे १०चे पाच झाले. यापेक्षाही अधिक चिंतेची बाब म्हणजे मतांचे प्रमाण एकाच झटक्यात १२ टक्क्यांनी घटले. राज्याच्या एकूण ९० पैकी ४४ विधानसभा क्षेत्रांत भाजपस काहीसे मताधिक्य मिळाले. याउलट काँग्रेस ४२ तर 'आम आदमी पक्ष' चार क्षेत्रांत आघाडीवर राहिला. लोकसभेचे वेगळे, विधानसभेचे निराळे हे खरे असले तरी यातून राजकीय वाऱ्यांची दिशा लक्षात येते. या दिशेत दोन कारणांनी बदल होऊ शकतो. भाजप स्वबळावर किती आश्वासक चेहरा त्या राज्यास देऊ शकतो, हे एक. आणि काँग्रेस, 'आप' हे 'इंडिया' आघाडी घटक किती पोक्तपणा दाखवू शकतात. खेरीज काँग्रेसला आपले बुलंद हरयाणवी भूपिंदर-दीपिंदर हुडा हे पितापुत्र आणि कुमारी सेलजा यांच्यातील संघर्षासही विराम द्यावा लागेल. त्या राज्यात काँग्रेसला पराभूत करण्यासाठी काँग्रेस इतकी ताकद भाजपत नाही. वर 'आप'ची स्वतंत्र लढण्याची भुणभुण हा धोका आहेच. या आव्हानांवर काँग्रेस कशी मात करते आणि दुसरीकडे भाजपचे अजूनही भिरभिरलेले मुख्यमंत्री नायब सिंग सैनी हे माजी मनोहरलाल खट्टर यांच्या सावलीतून बाहेर येऊन काही करू शकतात का आणि त्यासाठी नरेंद्र मोदी आदींच्या साह्याचा किती उपयोग होतो यावर हरियाणात काय होईल हे ठरेल.

तथापि या निवडणुकीचे नायकत्व आहे ते जम्मू-काश्मिराकडे. तब्बल दहा वर्षांनी या राज्यातील मतदारांच्या तर्जनीस विधानसभा निवडणुकीची शाई लागेल. त्याआधी राष्ट्रप्रेमी भाजप आणि राष्ट्रद्रोही मेहबूबा मुफ्ती यांच्या 'पीडीपी' यांची सत्ता होती. ते सरकार भाजपच्या इच्छेनुसार गेले. पुढे २०१४ नंतर त्या राज्याने लोकनियुक्त सरकार पाहिलेले नाही. नंतर तर तीन वर्षांनी त्या राज्यास विशेष दर्जा देणारे 'अनुच्छेद ३७०' निष्प्रभ केले गेले आणि त्या राज्याची दोन शकलेच केली गेली. त्यानंतरच्या पाच वर्षात या राज्याने काय कमावले याचा वेध 'लोकसत्ता'ने अलीकडेच (६ ऑगस्ट) 'लालयेत पंचवर्षाणि' या संपादकीयात घेतला. या दहा वर्षांत बरेच काही घडले. त्यात श्रीनगर हे 'स्मार्ट' बनणार होते ते राहिले ही अत्यंत गौण बाब. हा स्मार्टनेस येण्याआधीच त्या शहरास पुराने कसे विदीर्ण केले याच्या आठवणी अद्यापही ताज्या असतील. तेव्हा श्रीनगरचे स्मार्ट होणे राहिलेच. पण केंद्राने २०२२ साली राज्यातील मतदारसंघांची पुनर्रचना करून हिंदूबहुल जम्मू परिसरातून अधिक आमदार येतील आणि त्याचवेळी मुसलमानबहुल काश्मीर खोऱ्यातून इतकी वाढ होणार नाही, याची खात्री करून घेतली. त्यानुसार जम्मूतून या विधानसभेत पूर्वीच्या ३७ ऐवजी आता ४३ म्हणजे सहा आमदार अधिक येतील तर काश्मिरातून एक. अशा तऱ्हेने यंदाच्या ९० आमदारांत जम्मूतील ४३ आणि काश्मिरातील ४७ असतील. ही मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यानंतर काही महिन्यांत दुर्दैवाने दहशतवाद्यांनीही आपल्या 'धोरणांची' फेरआखणी केली. परिणामी जम्मूतील दहशतवाद वाढला आणि काश्मिरातील घटला. ही नवी डोकेदुखी.

ती वाढत असतानाच लोकसभा निवडणुका झाल्या. तीत दहशतीत जगणाऱ्या जम्मू-काश्मिरातील नागरिकांनी सुखासीन दक्षिण मुंबईतील नागरिकांपेक्षा आपण अधिक लोकशाहीवादी आहोत हे दाखवून दिले. लोकसभा निवडणुकीत या राज्यात सरासरी ५८ टक्क्यांहून अधिक मतदान झाले. त्यात काश्मीर खोऱ्यातून 'नॅशनल कॉन्फरन्स'चे दोन, जम्मूत भाजपचे दोन आणि बारामुल्लासारख्या तप्त मतदारसंघातून शेख रशीद अहमद ऊर्फ इंजिनीअर रशीद हा निवडून आला. तो 'अवामी इत्तेहाद पार्टी'चा. त्याने एकाच वेळी पीपल्स कॉन्फरन्सच्या साजिद गनी लोन आणि नॅशनल कॉन्फरन्सचे माजी मुख्यमंत्री साक्षात फारुख-सुपुत्र ओमर अब्दुल्ला या दोन तगड्यांना हरवले. हा धक्का एवढाच नाही. हा इंजिनीअर रशीद दहशतवाद्यांस मदत केल्याच्या आरोपाखाली तुरुंगात आहे. त्याच्या प्रचाराची धुरा स्थानिक तरुणांनी उत्स्फूर्तपणे सांभाळत प्रस्थापितांना धूळ (की बर्फ?) चारण्यात यश मिळवले. इतकेच नाही. या निवडणुकीत एकेकाळच्या फुटीरतावादी पण भाजपच्या सहकार्याने राष्ट्रवादी झालेल्या माजी

## कुणबी समाजाचे भाग्यविधाते व थोर समाजसेवक एस. डि. शिंदे यांची २० वी पुण्यतिथी उत्साहात साजरी

द. रा. जि. प्रतिनिधी: संतोष उध्दरकर.

म्हसळा : दि. २० ऑगस्ट रोजी तालुका पंचायत समितीचे माजी सभापती व रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य , दि रायगड



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग चे माजी संचालक,कुणबी समाजाचे भाग्यविधाते थोर समाज सेवक कै . एस . डी .शिंदे साहेब यांची २० वी पुण्यतीथी त्यांचे जन्मस्थान असलेले म्हसळा तालुक्यातील मौजे चिखलप येथे समस्त ग्रामस्थ व महिला मंडळ चिखलप व शिंदे कुटुंबीय यांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली . यावेळी अनेकांनी शिंदे साहेब यांनी समाजासाठी, व इतर जनतेसाठी केलेले कार्य खुप महान आहे. असे काही ग्रामस्थ यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच पुण्यतिथी साजरी करत असताना त्यांचे संपुर्ण कुटुंब सहभागी झाले होते. या वेळी उत्तम विजय शिंदे, संतोष शिंदे , रघुनाथ मुंडे, शांताराम गिजे , राजेंद्र जाधव, अमृत गिजे , जयेश मुंडे , दिलीप शिंदे , मयूर पाखड ,राकेश मुंडे , तसेच कै एस . डी . शिंदे साहेब यांच्या सुकन्या अंजली बांद्रे ,जावई राजेंद्र बांद्रे, मुलगा सुशांत शिंदे , नातू सनराज बांद्रे , सून स्नेहा शिंदे आदी ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते .

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक सूर्योदय

गुरूवार २२ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

## नराधमाला फाशी द्या...शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या समस्त महिला आघाडी कडून अलिबाग मध्ये आंदोलन.

अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे:- : बदलापूरमध्ये दोन चिमुकल्या मुलींवर झालेल्या अत्याचाराने महाराष्ट्र हादरला आहे. तीन ते चार वर्षांच्या दोन मुलींवर



शाळेतील स्वच्छतागृहातील स्वच्छता कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केला. या घटनेमुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. त्या घटनेचा तीव्र निषेध करत दि.२१ रोजी शिवसेना मध्यावर्ती कार्यालय अलिबाग येथे आंदोलन करण्यात आले.ङ्गङ्गदिलेले निवेदनङ्ग अलिबाग तालुक्यातील समस्त महिला आघाडी कडून बदलापूर येथे लहान मुलीवर अत्याचार झाला त्याबाबत आम्ही आपणांस निवदेन देत आहोत, की सदर प्रकारातील गुन्हेगारास कठोरातील कठोर शिक्षा व्हावी. जेणे करून असे प्रकार पुन्हा पुन्हा होणार नाहीत व असे प्रकार करू पाहणाऱ्या नराधमास दहशत बसेल. तरी कृपया वरिल प्रकारातील गुन्हेगारास कठोरातील कठोर सजा देणेत यावी असे निवेदन जिल्हा अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना देण्यात आले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, तालुका प्रमुख शंकर गुरव, उपजिल्हा संघटक अजित पाटील, विभाग प्रमुख गिरीश शेळके, प्रवक्ते धनंजय गुरव, महिला आघाडी विधानसभा संघटिका तनुजा पेरेकर, तालुका संघटिका स्नेहल देवळेकर, उपतालुका संघटिका वंदना पाटील, मापगाव विभाग संघटिका निवेदिता गावंड, उपविभाग संघटिका तृप्ती जावकर आदी शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.

## बदलापुर येथे घडलेल्या माणुसकीच्या नात्याला काळीमा फासणाऱ्या गलिच्छ घटनेचा तीव्र निषेध

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे म्हसळा तालुका संघटना आक्रमक

द. रा. जि. प्रतिनिधी

संतोष उध्दरकर

म्हसळा: ठाणे जिल्हयातील बदलापुर येथे कुळगाव येथील नामांकित शाळा आदर्श विद्या मंदिर या शाळेतील दोन चिमुकल्या मुलींवर याच शाळेतील सफाई कर्मचारी या नराधमाने लैगिक अत्याचार केले. त्या मुळे संपूर्ण बदलापूर पेटले. या घृणास्पद प्रकाराने संपूर्ण बदलपुर हादरले. आणि याचे पडसाद संपूर्ण रायगडमध्ये देखील दिसुन येत आहेत. या अत्यंत घृणास्पद व माणुसकीला काळीमा फासणारा गलिच्छ जो प्रकार घडला आहे त्याच्या निषेधार्थ दि. २१ ऑगस्ट रोजी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे म्हसळा तालुका संघटना, युवासेवा, महिला आघाडी यांनी म्हसळा पोलीस ठाणे व म्हसळा तहसिल कार्यालय येथे निषेध पत्रक देऊन घटनेचा तिव्र संताप व्यक्त केला.यावेळी अशा नराधमाला भर चौकात फाशी द्यावी अशी प्रामुख्याने मागणी लावुन धरली. यावेळी श्रीवर्धन विधानसभा क्षेत्र संघटक रविंद्र लाड, युवासेना तालुका अधिकारी कौसुभ करडे, तालुका महिला आघाडी रिमा महामुणकर, निशा पाटील, शहर प्रमुख विशाल सायकर, उप. शहर प्रमुख दिपल शिर्के, नदीम दफेदार, तालुका सल्लागार पांडुरंग सुतार, समीर लांजेकर, अंकुश नटे, जुरेद अधिकारी तसेच युवासेना कार्यकर्ते उपस्थित होते.





एवढी मोठी गंभीर घटना घडून सुद्धा बदलापूर पोलीस प्रशासनाने गुन्हा दाखल करण्यासाठी १२ तास का लागले. कुणाचा दबाव होता का..? लैगिक अत्याचार, निघृण हत्या, महिलांवर अत्याचार या घटना थांबणार कधी. आमच्या लाडक्या बहिणींना पैसे नको.. सुरक्षा द्या..ङ्गकौस्तुभ करडे.ङ्गयुवासेना तालुका अधिकारी, म्हसळा.

## बदलापूर अकोल्या नंतर दाभोळमध्ये विकृत व्यक्तीचे थक्क करणारे कारनामे उघड

दापोली२१:- बदलापूर आणि अकोल्यातील विकृत मानसिकतेच्या घटना ताज्या असतानाच दापङली तालुक्यातील दाभोळमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ङ्ग दाभोळमधील चव्हाणवाडीत राहत असणाऱ्या रूपेश आडविलकर या विकृत व्यक्तीचे थक्क करणारे कारनामे समोर आले आहेत. दाभोळमधील एका महिलेने दिलेल्या तक्रारीनंतर हा सर्व प्रकार समोर आला आहे. गेल्या ७ ते ८ महिन्यापासून हा सर्व प्रकार घडत असल्याची माहिती महिलेने दिलीय. श्रध्दा तोडणकर यांनी याबाबतची तक्रार दाभोळ पोलीस स्टेशनला दिली आहे. जेव्हापासून राहत आहे तेव्हापासून या प्रकारचा मानसिक त्रास झाल्याचं श्रद्धा यांनी सांगितलं. याबाबत सविस्तर वृत्त असं आहे की श्रध्दा तोडणकर या चव्हाणवाडी शेजारी असलेल्या गुजरआळीत गेल्या काही महिन्यापासून राहत आहेत. मात्र मार्चपासून श्रद्धा राहत




असलेल्या रुमजवळ रात्री अपरात्री घराच्या छतावर दगड मारणे, खिडकी वाजवणे, दरवाजा वाजवण्याचे प्रकार घडत होते. एकटी महिला राहत असल्याने या सगळ्याची भीती आणि मानसिक त्रास श्रद्धा तोडणकर यांना झालाय. त्याचबरोबर त्यांच्या रूमच्या मागच्या साईडला असलेल्या बाथरुममध्ये स्त्रियांचे अंर्तवस्त्र, निरोधची पॅकेट टाकणे असे प्रकार एक दोन वेळा घडलेले आहेत. अनेकवेळा हे प्रकार घडत असल्याने श्रद्धा तोडणकर यांना मानसिक त्रास झाला. या प्रकारामागे नेमकं कोण आहे हे शोधण्यासाठी त्यांनी रूमच्या ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरा लावला. त्याच्या काही दिवसानंतर रूपेश आडविलकर हा व्यक्ती या सीसीटिव्ही कॅमेरामध्ये कैद झाला आहे. दरम्यान सीसीटिव्ही कॅमेऱ्याचा डाटा चेक करत असतानाङ्ग २३.३३ वाजताचे सुमारास एक अनोळखी इसम बेडरूमच्या खिडकीला असलेल्या लोखंडी जाळीला हाताने काहीतरी करीत असल्याचे दिसून आला असून . हा व्यक्ती त्याठिकाणा वरून मागील बाजूकडे निघून गेला. सीसीटिव्ही असलेला व्यक्ती ओळखीचा असून हा व्यक्ती चव्हाण वाडी दाभोळ येथे गेल्या पाच वर्षांपासून चव्हाण वाडीत राहत असल्याची माहिती आहे. याची खात्री करण्यासाठी दाभोळमधील गुजरआळीतील काही नागरिकांनी सदर व्यक्तीची ओळख सांगितली. सदर प्रकार हा त्या इसमानेच केलेला असल्याची खात्री झाल्यानंतर दाभोळ पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. हा व्यक्ती रूपेश आडविलकर, मुळ राहणार . कोळथरे कुंभारवाडी असून आता तो दाभोळमध्ये राहत होता. दाभोळ पोलिसांनी तातडीने तक्रारीचीदखल घेत सदर व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता (बीएनएस ) ७९ अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. अधिक पोलीस दाभोळ पोलीस करत आहे.

## श्रीरामनगर आयोजित तालुकास्तरीय कॅरम स्पर्धा उत्साहात संपन्न

दापोली :- कै रितेश जाधव स्मरणार्थ आणि श्रीरामनगर मित्र मंडळाच्या वतीने दापोली तालुकास्तरीय सिंगल आणि डबल कॅरम स्पर्धेच आयोजन श्रीरामनगर समाजमंदीरात करण्यात आले होते



.तालुक्यातील नामंवत खेळाडूंकडून उत्फुर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेच्या सिंगल कॅरम अंतिम फेरीत ओम मोरे याने अब्दुला याला पराभूत केले. तर डबल मध्ये ओम मोरे/ नवाज भाई या जोडीने आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत मजीद/बादशहा या जोडीचा पराभव करत विजेतेपद मिळवीले. .ङ्ग या स्पर्धेसाठी अबीर एटंरप्रायजेस - विरेंद्र लिंगावले,पंचशील प्लंबीग वर्क - हरेश तांबे ,समर्थ डेव्हलपर्स -मंगेश भैरमकर,वैभव सागवेकर,दीपेश पटेल,सौ सायली तांबडे यांजकडुन रोख पारितोषिक देण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी श्रीरामनगर मित्र मंडळ अद्यक्ष,उपाध्यक्ष, सदस्य,ग्रामस्थ आणि युवा सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले स्पर्धेसाठी लागणारे कॅरम,सामना पंच म्हणुन काम केलेल्या व्यक्तीं,मनोज मोहीते,विनायक यादव यांच्या विशेष सहकार्याबद्दल मंडळाच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

## किन्हळ येथे रानभाज्या, रानफुल रानवनस्पती प्रदर्शन व पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न

दापोली:- दापोली कृषी महाविद्यालयातील ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रम (रावे) अंतर्गत कार्यरत असलेल्या विद्यार्थिनींच्या कृषीसखी व मृदगंध या गटान तर्फे किन्हळ येथे रानभाज्या, रानफुले आणि रानवनस्पती प्रदर्शन व पाककला स्पर्धा ङ्गउत्साहात पार पडली. यावेळी विषय विशेषज्ञ डॉ. उदयकुमार पेठे, कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण झगडे, गावचे ग्रामपंचायत सदस्य श्री गणेश काणू चीपटे , महिला मंडळ सचिव सौ किमया विश्वास रेवळे, मुख्याध्यापक श्री महेंद्र जालगावकर , सहशिक्षक श्री प्रदीप गमरे , सहशिक्षिका सौ संजीवनी लाडे, श्री प्रशांत पांडुरंग चीपटे, श्री सुरेश केशव डायनाक व इतर गावकऱ्यांच्या सहाय्याने हेव्यासपीठावर उपस्थित होते. ग्रामविकास मंडळ किन्हळ मंच येथे औपचारिक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध प्रकारच्या एकूण ११ रानभाज्या व त्यांची सविस्तर माहिती , औषधी गुणधर्म हे भिंती पत्रकाद्वारे सर्वांसमोर मांडण्यात आले . त्याच प्रकारे रान फुले रान वनस्पती यांचा देखील समावेश होता . तसेच रानभाज्यांपासून पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती ज्यामध्ये एकूण ३४ स्पर्धकांनी सहभाग दर्शवला. या स्पर्धेसाठी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री महेंद्र जळगावकर व सौ संजीवनी लाडे मॅडम हे परीक्षक म्हणून लाभले. या स्पर्धेमध्ये शाळेतील सर्व मुलांना रानभाज्यांची ओळख करून देण्यात आली. पाककला स्पर्धेमध्ये सुरेखा सुरेश डायनाक यांनी प्रथम, किमया विश्वास रेवाळे यांनी द्वितीय, तेजल प्रशांत चिपटे यांनी तृतीय क्रमांक पटकावला . हे प्रदर्शन बघण्यासाठी जिल्हा परिषद शाळा किन्हळ मधील शिक्षक व विद्यार्थी यांनी तसेच शेतकरी व महिला वर्गाने हजेरी लावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी सखी गटाची




विद्यार्थिनी शामल दुधाळ हिने केले कार्यक्रमाची रूपरेषा व उद्दिष्टे श्रेया शिंदे व प्रार्थना गुरव यांनी सर्वांसमोर मांडली. ऋतिका तारमाळे , विद्या बोंदर व श्रुती विदे यांनी मान्यवरांचे स्वागत केले . बक्षीस समारंभ डॉ. प्रवीण झगडे व आभार आभार प्रदर्शन संपदा सस्ते, त्रिवेणी जाधव व श्रावणी मोरे यांनी केले. या कार्यक्रमासाठी विषय विशेषतज्ञ डॉ उदय पेठे व कार्यक्रम अधिकारी डॉक्टर प्रवीण झगडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले . यावेळी संपूर्ण कृषी सखी गट व मृदुगंध गट यांनी उपस्थिती दाखवली. तरी या कार्यक्रमाला ४५ ग्रामस्थ उपस्थित होते.

मुंबई विभागीय कार्यालय पत्ता : बी विंग / फ्लॅट नंबर ३०९ , मारुती दर्शन, हनुमान चौक, लोकमान्य टिळक रोड, मुलुंड पूर्व, मुंबई - ४०००८१- अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक) , नयानिष गोळे : (आवृत्ती कार्यकारी संपादक)

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )